# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २१/०९/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**१) पो.स्टे. बोरी :–** अंतर्गत ०१ कि.मी अंतरावर मौजा बोरी शिवार पार्श्वनाथ साडी सेंटर समोर येथे दिनांक २०/०९/२०२२ चे ०८.०० वा. ते ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– लोकेश अशोक गजभिये, वय १८ वर्ष, रा. जुनी वस्ती वार्ड न १ बुटीबोरी जि. नागपूर यांची आई नामे– आशा अशोक गजभिये (जखमी), वय ३५ वर्ष व आरोपी नामे– प्रमोद महादेव पाटील, वय ५८ वर्ष, रा. सातगाव ता. हिंगणा नागपूर यांचे प्रेम संबध होते. फिर्यादीची आई ही आरोपी सोबत राहत होती व काही दिवसापुर्वी ती पती सोबत राहायला आली होती. तेव्हा पासुन आरोपी हा जखमी हिला पैसे मागायचा व धमकी दयायचा नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी यातील जखमी ही कामाला जात असतांना आरोपीने त्याच्या ताब्यातील गाडी ४०७ क्र. एमएच– ३१/एम– ६०९५ ने फिर्यादीची आई आशा गजभिये हिला मागुन धडक मारून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि रेजीवाड या करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत ०.५ कि.मी अंतरावरील मडकी चौक सावनेर येथे दिनांक २०/०९/२०२२ चे १५.०० वा. ते १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. दिक्षा नंदकुमार गिरगुसे, वय २४ वर्ष, रा. सटवा माता मंदीर सावनेर, ता. सावनेर जि. नागपूर व आरोपी नामे– नंदकुमार निळकंठराव गिरगुसे, वय ३१ वर्ष, रा. सटवा माता मंदीर सावनेर, ता. सावनेर जि. नागपूर हे दोघेही पति–पत्नी असून यांचे आपसात पटत नाही. दि. ३०/१०/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी व त्याचे नातेवाइका विरूद्ध गुन्हा नोंद असुन सावनेर कोर्टात केस सुरू असतांना आपसी समझोता म्हणुन मा. कोर्टाने फिर्यादी व आरोपी यांना सोबत राहणेबाबत दिलेल्या तोंडी आदेशावरून आरोपीने फिर्यादीस दि. १७/०६/२०२२ रोजी तिचे माहेरून घेवून आल्यानंतर वेगळ्या घरी राहत असता पून्हा फिर्यादीवर संशय घेत तिने यापूर्वी दिलेल्या रिपोर्टच्या कारणावरून शिवीगाळ व मारपीट करीत होता. घटना ता वेळी फिर्यादी ही घरी हजर असता जूने रिपोर्टचे कारणावरून 'आता मि तुला मारल्या शिवाय राहणार नाही' असे म्हणत हाताने फिर्यादीचा गळा दाबून व काठीने डोक्यावर, कमरेवर, पाठीवर, डाव्या खांद्यावर मारून जिवीनाशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि दानोडे मो.क्र. ९१४६६२५३३२ हे करीत आहे.

## घरफोडी

**१) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील तहसिल कार्यालय सावनेर येथील इमारत मधील सेतु कार्यालय सावनेर येथे दिनांक १९/०९/२२ चे २१.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– बाळु भाउरावजी मोरे, वय ३८ वर्ष, रा. वार्ड नं. १२ बाजार चौक, सावनेर ता. सावनेर जि नागपुर हे काम करीत असलेले तहसिल कार्यालय सावनेर येथील इमारती मधील सेतु कार्यालयाचे मुख्य दरवाजाचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन कार्यालयाच्या आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने आतमध्ये ठेवलेल्या लोखंडी कपाटाचे कुलुप तोडुन त्यामध्ये ठेवलेल्या काळया बॅग मधील चिल्लर पैसे अंदाजे ७०० नगदी चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव ८८८८८२१३९३ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान**:– अंतर्गत ०८ कि.मी अंतरावरील एन.एच ४४ रोडच्या बाजुला परफेक्ट लॉजच्या काही अंतरावरील कन्हान येथे दिनांक २०/०९/२२ चे १३.०० वा. ते १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्राजु उर्फ जोखीम लरस वय ४४ वर्ष, रा. रिता मन्युथलरफाय लब्लॉक ओवर ब्रीज मानकापुर, संत मार्टीन नगर, जरीपटका हे मॅकेनिक चा काम करतात. ते रामटेकला जात असतांना रसत्यात लघुशंका करिता थाबंले असता त्यांनी आपला मोबाईल आपल्या बाईकच्या समोरील ग्लोबॉक्स मध्ये ठेवला असता तेवळयात एका मोटारसायकल वर ३ अज्ञात आरोपी हे ट्रिपल सिट येवुन फिर्यादीचा मोबाईल फोन विवो वाय ७५ कंपनी किंमत २१,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी विरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जैलाल सहारे मो.न.९३०९९६६३९२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत १४ कि.मी अंतरावरील ग्राम पंचायत देवळी जुनोना तह. नरखेड येथे दिनांक १२/०९/२२ चे ०९.०० वा. पुर्वी फिर्यादी नामे– कु. सुनंदा पुजाराम तपासे वय ५२ वर्ष रा.वार्ड क्र. १७ नरखेड या ग्राम पंचायत देवळी जुनोना येथे ग्राम सेवक पदावर नौकरी करतात. शासनाकडुन ग्राम पंचायत देवळी ला मदार नदीचे पाणी साठवण्याकरीता लोखंडाच्या फळया अनुदानात प्राप्त आहेत. नमुद घटना, ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे ग्राम पंचायतच्या पाणी साठवण्याच्या लोखंडाच्या जुण्या ३६ फळया प्रत्येकि १,८००/–रू. असा एकुण किमती ६४,८०० /–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी विरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक कैलास उईके मो.नं. ८४८५८६२९६२ हे करीत आहे.

.
.
.
.
.
.

## विश्वासघात करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील मौजा कोराड मौदा येथे दि. २०/०९/२२ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गं.भा शशीकला सुर्यकांत भादलकर वय ६५ वर्ष, रा. कोराड ता. मौदा ही घरी भांडे घासत असतांना फिर्यादी चे घरी काही मुले हीरो होडां फॅशन प्रो गाडी नबंर प्लेट नसलेली आले व गेट च्या बाहेरून एका अज्ञात आरोपीने आवाज दिला. फिर्यादीने बाहेर जाउन पाहिले असता तो निळया रंगाचे शर्ट व काळया रंगाचा पॅन्ट घालुन सेल्समन ड्रेसमध्ये उभा होता. त्यानंतर त्याने म्हटले की, या पावडरने तांबे पितळ व सोन्याचे चांदीचे दागिने हे चमकविता येतात असे म्हणून १ फिर्यादीच्या गळयात सोन्याचे मनी ची माळ त्याला लागून असलेले सोन्याच्या गणपतीचे लॉकेट अर्धा तोळा सोन्याचे, कानातले बिरया व त्याला वेल असलेले सोन्याच्या अर्धा तोळयाचे दागिने असा एकुण ५०,०००/–रू. चा माल अज्ञात आरोपीने फिर्यादीला विश्वासात घेवुन चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार शैलेश बेले मो क्र. ८२०८८४१०३७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**